INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# आदिवासी साहित्य संमेलन वसा आणि वारसा

**प्रविण गणेशराव लोखंडे**
संशोधक विद्यार्थी
(एम.ए) मराठी
ई-मेल: lokhandepravin38@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/06.2021-73962962/IRJHIS2106039

**प्रस्तावना:**

साहित्य-संमेलन हे महाराष्ट्राचे खास सुवर्ण वैभव आणि वैशिष्ट्ये आहेत. आखिल भारतीय, प्रादेशिक, आदिवासी, प्रांतिय, उपनगरीय, शारदीय, वासंतिक, महिलांची, बाल-कुमारांची, नवोदितांची, होतकरूंची, ग्रामीण, दलित इ. नाना प्रकारची मराठी भाषिकांची साहित्य संमेलने मोठया संख्यने व उत्सहाने होतात या सर्व संमेलनामध्ये' आदिवासी साहित्य संमेलन' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या व सर्व मराठी बोली भाषिकांचे प्रतिनिधिक ठरलेला संमेलनाला विशेष महत्व आहे .

खरं तर, प्रामूख्याने परकिय राजवटीच्या कालखंडात राजकीय, धार्मिक, सांस्कृतीक स्थित्यंतरामुळे समाजजीवन गतीने बदलले. या बदलाचे सर्वस्वी श्रेय भारतावर राज्य करणारे शेवटचे सत्ताधिश इंग्रजांना द्यावे लागेल. सत्ता स्थापण करतांना त्यांनी सामाजीक सुधारणांना प्राधान्य दिल्यामुळे येथील सर्वसामान्य मानसांचा जगण्याचा स्थर उंचावला. महाराष्ट्रावर या बदलाचा अमुलाग्र परिणाम झाला. त्यांनी केलेल्या शिक्षण प्रसाराच्या कार्यामुळे तरूणांची सुशिक्षीत पिढी घडली. मुद्रण कला व छपाई यंत्राच्या विकासामुळे ग्रंथ निर्मीतीला वेग आला. त्यामुळे सर्वांपर्यंत याचे लोण पोहोचले. शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ यांच्यात क्रांती घडुन आली. सर्वांनाच ज्ञानाची दरवाजे खुली झाली. या ज्ञानातुनच समाजाला तेजस्वी विचार आणि अचुक दिशा देणारे नेतृत्व समाजसुधारक, विचारवंत, क्रांतीकारक यांच्या रूपाने निर्माण झाले. त्यामध्ये बाळशास्त्री जांभेकर, विष्णुशास्त्री चिपळुणकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, लोकमान्य टिळक, गो. ग. आगरकर आदींचा समावेश होतो.

शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीचे उद्दिष्टे समोर ठेवुन अनेक समाज सुधारकांनी शिक्षण प्रसाराच्या प्रमुख नावाखाली चळवळ गतिमान केली. याला ही त्यांनी दैनिके, मासिके विविध प्रमुख लेख, ग्रंथसंपदा याचा प्रामुख्याने वापर केला. या कल्याणकारी सुधारणाचा शैक्षणीक, सांस्कृतीक व वाङ:मयीन अंगाने विचार करतांना संपन्न ग्रंथालय चळवळ

यातुन विकसीत झाली. त्यातुनच पुढे ग्रंथालय संमेलनेही संकल्पणा रूढ झाली. या ग्रंथालयाच्या आधारे 'ग्रंथालय' संमेलनाची गुढी रोवली गेली येथुन मराठी साहित्य संमेलनाला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला.

यातुनच आदीवासी साहित्य संमेलन ही तेजस्वी संकल्पना समोर आली. आणि ती महाराष्ट्राच्या मातीत आदिवासींचा, शोषीतांचा प्रखर आवाज म्हणुन सर्वार्थाने रूढ झाली.

**आदिवासी साहित्य संमेलन म्हणजे काय ? व इतिहास :**

आदिवासी साहित्य संमेलन म्हणजे साहित्याची खऱ्या अर्थाने मांदियाळी होय. आदिवासी भाषेतील लोकगीते, लोकसाहित्य, लोकजीवन, सामाजीक वाङ:मयीन प्रश्न, आदिवासी बोलीभाषा चालीरूढी, प्रथा, परंपरा, इतिहास, कुटूंबपध्दती अशा अनेक घटकांचा आनंद सोहळा या साहित्य संमेलनातुन साजरा केला जातो आदिवासी साहित्य संमेलनामागे वाचन संस्कृती रूजविणे, आवड निर्माण करणे. नवनिर्मात विचारांना चालना देणे, आदिवासी बोलींचे संवर्धन करून त्याचा शब्द संग्रहकोश तयार करणे आदिवासी विषयक सामाजीक-सांस्कृतीक प्रश्नांना वाचा फोडणे, विविध भाषेतील कल्याणकारी, साहित्याचे अनुवाद करणे, अंधश्रध्दा कमी करणे, वैचारीक बाबींचा सर्वांगाने विचार व विकास करणे आदी विचारांची संस्कृती जपुन ठेवण्यासाठी आदिवासी साहित्य संमेलने सर्वार्थाने प्रभावी आहेत.

ह्या संमेलनाची गंगोत्री म्हणजे न्यायमुर्ती महोदय गोंविद रानडे, यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे ११ मे १८७८ रोजी भरलेले पहिले 'मराठी ग्रंथकार संम्मेलन होय. दुसरे संमेलन त्यानंतर सात वर्षांनी (१९८५) पुण्यातच कृष्णशास्त्री राजवाडे यांच्या अध्यक्षतेखाली भरले. तिसरे संमेलन भरण्यासाठी त्यांनंतर २० वर्षांचा कालावधी लागला व हे संमेलन पुण्याबाहेर साताऱ्यात (१९०५) र .पां .करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले. चौथे संमेलन (१९०६) मध्ये पुण्यात गो. वा. कानिटकर यांच्या अधक्षतेखाली भरले त्यासाठी प्रामुख्याने टिळक, केळकर, खाडिळकर यांसारख्या वैचारीक प्रगल्भता असणाऱ्या मंडळीचा पुढाकार होता. याच संमेलनामध्ये २७ मे रोजी 'महाराष्ट्र साहित्य परिषदेची' स्थापना करण्यात आली. ग्रंथकार संमेलनातुन साहित्य परिषदेचा जन्म झाला.

आदिवासी साहित्य संमेलनाला प्रदिर्घ अशी परंपरा असुन त्याचा इतिहास रोमहर्षक व तितकाच संघर्षाचा आहे. महाराष्ट्रात ठिकठिकाणी ग्रंथालय व त्याची अभिरूची वाढविण्याचे काम सुरूवातीला समाजसेवक व साहित्यीकांनी केले. विविध आदर्श साहित्यीकांच्या नेतृत्वाखाली ग्रंथालयाचे वाङ:मयीन चळवळीत रूपांतर होवुन साहित्य संमेलनाला सुरूवात झाली राज्यस्तरीय पहिले आदिवासी साहित्य संमेलन १९८९ साली, संमेलनाचे अध्यक्ष नामदार श्री.लक्ष्मण माने यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरीत्या पार पडले. आदिवासी साहित्य समाजासमोर यावे, या अभ्यासपुर्ण साहित्यीक चळवळीला चालना मिळावी, ज्ञानाची देवाण घेवाण व्हावी, नवोदित कवींना साहित्यकांना प्रोत्साहन मिळावे, साहित्यीक, वैज्ञानीक दृष्टीकोन जागृत होवुन समाज विकासाला गती मिळावी यासह विविध कल्याणकारी उपक्रम सामाजीक, सांस्कृतीक, शैक्षणीक विकासासाठी राबविणे हा उद्देश संमेलन भरवण्यामाघे होता यातुनच आदिवासी साहित्य संमेलनाची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोवली गेली. व पुढे चालून अनेक विषय घेवुन विविध साहित्य संमेलने भरवली गेली व ती आजतागायत चालु आहे.

**आदिवासी साहित्य संमेललनाचे स्वरूप:**

आदिवासी साहित्य संमेलनाचे स्थळ, काळ परिस्थिती वेगवेगळया स्वरूपाचे असते, ग्रंथ दिंडी, उद्घाटन सोहळा, संमेलन अध्यक्ष भाषण, परिसंवाद, कथा कथन, कवि संमेलन, शैक्षणीक आणि सांस्कृतीक कार्यक्रम व समारोप या क्रमाने त्याचे आयोजन केले जाते. ज्या प्रदेशात संमेलन असते तेथील आदिवासी लोक संस्कृती पंरपरेचाही त्यात समावेश होतो. त्यानुसार त्याचे वैचारीक विविधांगी स्वरूप ठरते.

या लोकप्रिय, समाजाभिमुख संमेलनाची सुरूवात ग्रंथ दिंडीने होते. यातुन वाङ:मयीन प्रफुल्लीत वातावरण निर्माण होण्यास मदत होते. प्रभावशाली समाजसुधारक, आदर्श विचारवंत, थोर व्यक्तीमत्व यापैकी कुठल्याही महापुरूषाच्या पुतळयास अभिवादन वरून दिंडीस प्रारंभ होतो. या ग्रंथदिंडीत ग्रामस्थ, लेखक, कवी, रसीक, विद्यार्थी, महिला वर्ग मोठ्या संख्योने सहभाग नोंदवितात उज्ज्वल मराठी साहित्य विश्वात युग प्रवर्तक ठरलेल्या साहित्य कृतीचा पालखीत मानाचे स्थान मिळते. संमेलन स्थळी दिंडी आल्यानंतर वाचन संस्कृती रूजावी या हेतुने ग्रंथ नगरीचे उद्घाटन होते.

उज्ज्वल मराठी भाषा विश्वावर व साहित्यावर प्रेम करणारे अनेक रसिक, वाचक, पुस्तक प्रेमी ग्रंथ विकत घेतात. यातुन मराठी साहित्याचे वाचक असणाऱ्या व्यक्तींना स्फुर्ती व प्रेरणा मिळते. परिसंवाद हा संमेलनाचा वैचारीक तितकाच गंभीर व टिका टिप्पणींचा घटक होय. कथा कथन ओजस्वी कवि संमेलन, विविधांगी सांस्कृतीक कार्यक्रमातुन स्थानिक नवोदीत कवी, लेखक, विविध कलाकार आदींना यातुन व्यक्त होण्याची संधी मिळते.

माय बाप स्त्रोते, रसीकांसाठीही खास मेजवानीच असते. यातून विविध नव कल्पणांची, ज्ञानाची देवाण घेवाण होण्यास मदत होते. तसेच लेखकालाही कला सादरीकरण्यास यातुन प्रचंड प्रेरणा मिळते. समारोपीय कार्यक्रमात आदिवासी मराठी भाषा साहित्य यांच्या विकासासाठी संवर्धनासाठी विविध ठराव मांडले जातात. तसेच पुर्वलक्षी ठरावाचा आढावा घेतला जातो.

**आदिवासी साहित्य संमेलनाची सद्यस्थिती:**

आदिवासी साहित्य संमेलनाचा सध्याचा प्रवास गर्दीकडून दर्दीकडे होत आहे. स्थानिक प्रतिभेला प्राधान्य देवून त्यांच्या उपजत कलांना वाव देण्याचा प्रयत्न या साहित्य संमेलनाच्या माध्यमातुन करण्यात येतो. बालकुमार मेळावा, नवोदीत कवी, बोलीभाषा, अशा नाविण्यपुर्ण उपक्रमाच्या माध्यमातुन संमेलनाचा पारंपरीक चेहरा आता बदलत आहे. बालकुमार वाचकांसाठी स्वतंत्र्य मेळावाचे आयोजन आता करण्यात येत आहे याशिवाय स्त्रि वर्गाला प्रतिनिधित्व मिळावे यासाठी' ग्रामीण आदिवासी स्त्रि-वास्तवातील आणि साहित्यातील' यासारख्या अनेक उज्वल आणि जिवंत विषयावर परिसंवादाचे आयोजन आता आदिवासी साहित्य संमेलनात प्रामुख्याने होत आहे. नवोदीत आणि युवांना साहित्य संमेलनात स्थान मिळण्यासाठी नवोदीत लेखक मेळावे नवे कवी, नवी कविता, शोध युवा प्रतिभेचा असे अनेक विविधरंगी उपक्रमही राबविण्यात येत आहे. यातून समृध्द आदिवासी लोकगिते, लोकसाहित्याचा वसा आणि वारसा सर्व लेखक, साहित्यीक पुढे नेत आहे.

**आदिवासी साहित्य संमेलनाची उद्दिष्टे :**

१) आदिवासी मराठी बोलीभाषेची गोडी व तेजस्वी वाचण संस्कृती जणमानसात समाजात रूजविणे.

२) आदिवासी मराठी बोलीचे संवर्धन होवून नवलेखकांना अविष्कारासाठी विचारमंच उपलब्ध करणे.

३) भाषीक नवनिर्मीती तसेच विचारांची आदान-प्रदान व्हावी व त्यातुन प्रेरणादायी व स्फुर्तीदायक वाचकांची, लेखकांची एक पिढी निर्माण व्हावी.

४) सामाजीक अंधश्रध्दा, विविध वाईट चालीरिती परंपरा यांचे समुळ उच्चाटन व्हावे.

५) आदिवासी साहित्य संस्कृतीच्या अभिवृध्दीसाठी प्रयत्न करणे.

६) जिवनातील नविन अव्हाणाला सामोरे जाण्यासाठी साहित्याव्दारे सर्वसामान्यांमध्ये आत्मबळ निर्माण व्हावे.

७) दर्जेदार साहित्य कृती निर्माण करून पुस्तक रूपाने प्रकाशीत व्हावी.

८) सर्व आदिवासी बोलीभाषांचे जतन करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे.

**समारोप :**

आदिवासी साहित्य संमेलन हे एक प्रेरणादायी व स्फुर्ती देणारे विचारमंच आहे. यातुन साहित्यीक सृजनशिलता नवनिर्माण करण्यासाठी तसेच नवोदीत लेखक, कवी, लेखनाची प्रचंड आवड असणऱ्या कला रसिकांसाठी एक खुले विचारमंच आहे यातुन बोलीभाषेच्या संवर्धनासह भाषीक विकासासाठी हे साहित्य संमेलन महत्वपुर्ण आहे.

समाजातील अंधश्रध्दा दूर करून समाज विकासासाठी नविन कल्पणांचा जन्म याच विचार मंचावरून होतो. भाषेची गोडी तसेच विविध महत्वपुर्ण साहित्य व विचार जणमानसापर्यंत पोहचविण्याचे अव्दितीय कार्ये या आदिवासी साहित्य संमेलनाच्या माध्यमातुन घडत आहे. म्हणुनच हे सर्वांगाने महत्वपुर्ण व कल्याणकारी आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) डॉ. गोविंद गोरे- आदिवासी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणे, सुगावा प्रकाशन.

२) रोगटे तुकाराम (२००७) - आदिवासी कवितेचा उष:काल आणि सद्यस्थिती, संस्कृती प्रकाशन.

३) डॉ. प्रमोद मुनघाटे - आदिवासी मराठी साहित्य स्वरूप आणि समस्या, प्रतिमा प्रकाशन.

४) प्रा. डॉ. पुष्पा यशवंत गावित - आदिवासी संस्कृती भाषा आणि सहित्य.

५) डॉ. भगवान अ. राजपुत (२०१७)- पालघर जिल्हा आदिवासी समाज लोकजिवन व लोकसाहित्य, अभय पब्लिकेशन धुळे.